# महाराष्ट्र शासन,
# जिल्हा परिषद अहमदनगर,
# पंचायत समिती राहाता

# नविन विहीर पॅकेज यशोगाथा

## योजना - डॉ.बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजना

## कृषी विभाग - पंचायत समिती राहाता

श्री. पी डी वाघेरे   कृषी अधिकारी राहाता

श्री. एम.यु.शेवाळे, विस्तार अधिकारी कृषी
श्री. के.डी .अरगडे , विस्तार अधिकारी कृषी

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजना यशोगाथा

लाभार्थीचे नांव :- **श्री. अर्जुन सुभाष पगारे** रा. चितळी

गट क्र./ सर्व्हे क्र. :- 192, क्षेत्र :- 0.75 हे., ठिकाण :- चितळी, ता. राहाता, जि. अहमदनगर

### मंजूर घटक व प्रत्यक्षात पूर्ण केलेले घटक

| अ. क्र. | मंजूर घटक | अनुदान रक्कम रू. | प्रत्यक्ष अदा केलेले अनुदान | शेरा |
|---|---|---|---|---|
| 1 | नविन विहीर | 250000/- | 250000/- | विहीरीचे काम पूर्ण |
| 2 | इनवेल बोअरींग | 20000/- | 20000/- | इनवेल बोअरींगचे काम पूर्ण |
| 3 | पंपसंच | 20000/- | 20000/- | पंपसंच खरेदी |
| 4 | वीज जोडणी आकार | 10000/- | 3774/- | कोटेशन प्राप्त |
| एकूण | | 3,00,000/- | 2,93,774/- | |

डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजना सन 2017/18 पासून कार्यान्वित झालेली आहे. सदर योजनेत जुन्या विशेष घटक योजनेच्या तुलनेत सिंचन विषयक बाबीकरिता भरीव तरतूद करणेत आलेली आहे. सदर योजनेतून 150000/- चे आत उत्पन्न असलेल्या अनु.जातीच्या शेतक-यांना सिंचन विषयक बाबीकरिता नवीन विहीर, जुनी विहीर दुरुस्ती, इनवेल बोअर, वीज जोडणी, शेततळे अस्तरीकरण, सौर कृषी पंप लाभार्थी हिस्सा, पंप संच, तुषार सिंचन संच, ठिबक सिंचन संच या बाबीकरिता भरीव व पॅकेज स्वरुपात अनुदान दिले जाते. या योजनेमध्ये लाभार्थी शेतक-याच्या सिंचनविषयक सर्व गरजा एकाच योजनेतून एकाच वेळी पूर्ण होत असल्याने ही योजना अतिशय लोकप्रिय झाली आहे.



श्री. अर्जुन सुभाष पगारे यांची लॉटरी प्रक्रियेद्वारे नविन सिंचन विहीर या घटकासाठी निवड झाल्यानंतर पंचायत समिती राहाता कृषी विस्तार अधिकारी श्री. शेवाळे यांनी त्यांना संपर्क करून कागदपत्र अपलोड करणेबाबत मार्गदर्शन केले व त्याचवेळी त्यांना वीज जोडणी आकार, पंपसंच व ईनवेल बोअरींग या घटकांसाठी अर्ज करण्याबाबत सांगून त्यांचेकडून तसे अर्ज महाडीबीटी प्रणालीवर नोंदवुन घेतले.

त्यांची अहमदनगर जिल्हयातील राहाता तालुक्यात चितळी शिवारात 0.75 हे. शेतजमिन असून सदर क्षेत्र पुर्णपणे कोरडवाहू असल्याने खरीपात बाजरीसारखी कोरडवाहू पीक घेत असत. परंतू पीकासाठी लागणारा खर्च जास्त व येणारे उत्पन्न कमी त्यामुळे शेती कायम तोटयात येत असत. त्यामुळे त्यांचे कुटुंबास मोलमजूरी करून उदरनिर्वाह करावा लागत होता.

नविन विहीरीचे कामास मंजूरी मिळाल्यानंतर त्यांनी लगेचच विहीरीचे कामास सुरूवात केली.





विहीरीचे काम वेळेत पूर्ण केले व सुदैवाने त्यांचे विहीरीस पाणी उपलब्ध झाले.





त्याच दरम्यान वीज जोडणी आकार, पंपसंच व ईनवेल बोअरींग या घटकांसाठीही त्यांची निवड झाली. लगेचच कागदपत्र अपलोड केले असता जिल्हा प्रशासनाकडून तात्काळ मंजूरीही प्राप्त झाली. त्यानुसार वीज वितरण कंपणीकडेही नविन वीज जोडणीसाठी ऑनलाईन अर्ज सादर केला.

परंतू उपलब्ध पाणी उन्हाळी हंगामात पुरणार नाही असा अंदाज श्री. पगारे यांना आल्याने त्यांना मंजूर असलेले ईनवेल बोअरींगचे काम करण्याची तयारी केली. त्यानुसार ईनवेल बोअरींगचे काम केले असता त्यात मुबलब पाणी ऊपलब्ध झाले.






त्यानंतर लगेचच त्यांनी पंपसंच खरेदी केला व सोयाबीन पीकास टंचाई कालावधीत सिंचनासाठी वापर केला. त्यामुळे त्यांचे सोयाबीन पीक ऊत्तम आले. 0.60 हे. क्षेत्रामध्ये त्यांना उत्तम गुणवत्तेचे 11 क्वींटल सोयाबीनचे ऊत्पन्न मिळाले तर रब्बी हंगामात 12 क्वींटल गव्हाचे ऊत्पन्न मिळाले.





नविन सिंचन विहीर, त्यासोबतच ईनवेल बोअरींग यामुळे मुबलक पाणी ऊपलब्ध झाले, तसेच सिंचन करण्यासाठी पंपसंचही उपलब्ध झाल्याने व हे पाणी पुर्ण ऊन्हीळी हंगामातही ऊपलब्ध राहील असा लाभार्थीस विश्‍वास असल्याने लाभार्थीने रब्बी हंगामात धान्यासाठीची गहु पिकाची लागवड केली.

श्री. पगारे यांना या क्षेत्रामधून त्यांना साधारण 20 ते 25 क्वींटल मका पीकाचे ऊत्पन्न अपेक्षीत असून त्यापासून साधारण 45 हजार ते 55 हजार रूपयांचे ऊत्पन्न अपेक्षीत आहे.

